॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ६८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


**✻ सुविचार ✻**

स्वप्ने पहा आणि ती पूर्ण करण्यासाठी मेहनत करा.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### निगरगट्ट समाज

आज इथे उद्या तिथे
रोज नवा अत्याचार
निगरगट्ट समाज ओठी
शब्द फुटेना चार
कुणी सांगायची कुणाला
खरेपणाची व्यथा !
मलम ऐवजी मीठ लावून
जखमेची बनवतात कथा

# जलयुक्त शिवार ३.० मध्ये टँकरग्रस्त गावांना प्राधान्य

## मागील पाच वर्षांत टँकरने पाणीपुरवठा झालेल्या गावांचे विशेष सर्वेक्षण करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**● मुंबई । वीरभूमी –** महाराष्ट्रातील मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागलेल्या पाणीटंचाईग्रस्त गावांचा जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्याने समावेश करून, या गावांमध्ये जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत बैठक झाली. या बैठकीत राज्यातील जलसंधारणाची कामे, जलस्रोतांचे बळकटीकरण तसेच विविध विभागांच्या समन्वयातून जलव्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि जलस्रोतांचे बळकटीकरण यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पांची कामे निश्चित करण्यात आली आहेत, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. या कामांना प्राधान्याने गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. त्यामुळे जलसंधारणाची कामे अधिक परिणामकारक आणि थेट पद्धतीने पूर्ण करता येतील.

मागील पाच वर्षांत ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, अशा गावांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांना जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. या गावांमध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंधारणाची कामे निश्चित करावीत. तसेच जलस्रोतांच्या बळकटीकरणामुळे निर्माण झालेला सकारात्मक परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाशी संबंधित यशकथा तयार करून त्यांचा प्रभावी प्रसार करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे जलविषयक सल्लागार श्रीराम वेदिरे यांनी मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत सादरीकरण केले.

बैठकीस मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासो धुळाज आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## SPOT NEWS

### टॅक्सी चालकांन २० ऑगस्टपासून मराठी सक्ती

**● मुंबई –** राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे किमान व्यावहारिक ज्ञान असणे अनिवार्य असून, या नियमाची अंमलबजावणी गुरुवार २० ऑगस्टपासून करण्यात येणार आहे. मराठीचे व्यावहारिक ज्ञान नसलेल्या चालकांना सुरुवातीला एक महिन्याची नोटीस देण्यात येईल. या कालावधीत मराठीचे ज्ञान प्राप्त न केल्यास त्यांचा बॅज तीन महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात येईल, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी दिला. त्यानंतरही मराठी शिकण्यास जाणीवपूर्वक नकार दिल्यास बॅज आणि परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यात १९८९ पासून असलेल्या नियमाच्या आधारे रिक्षा आणि टॅक्सी चालविण्यासाठी व्यावहारिक मराठीचे ज्ञान आवश्यक आहे. १२ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या संबंधित कायदेशीर तरतुदीनुसार आता या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. मराठी शिकणार नाही, बोलणार नाही, अशा प्रकारची भूमिका घेणाऱ्या चालकांविरोधात कायद्याच्या चौकटीत कारवाई करणे हे परिवहन विभागाचे कर्तव्य आहे. अशा चालकांना आता कोणतीही अतिरिक्त मुदत न देता कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# सप्टेंबर महिन्यातही एल निनोचा प्रभाव जाणवणार

**● नागपूर । वीरभूमी –** राजधानी मुंबई आणि पुणे शहरात यंदा पावसाचा जोर दिसून आला. मात्र, पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हे आणि विशेषत: मराठवाड्यात एल निनोचा परिणाम दिसत आहे. या भागाला अजूनही पावसाची प्रतीक्षा आहे. ऑगस्ट महिना कोरडा गेल्यानंतर सप्टेंबर महिन्यातही एल-निनोचा प्रभाव आणखी तीव्रतेने जाणवणार असून विविध जिल्ह्यांची पावसाची तूट ऑगस्ट महिनाअखेर आणखी वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला.

गेल्या काही दिवसांपासून मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश जिल्ह्यांत ढगाळ वातावरण आहे. मात्र दमदार पाऊस पडेल, असा कुठलेही कमी दाबाचे क्षेत्र बंगालच्या उपसागरात तयार होत नसल्याने विदर्भ, मराठवाड्यासह मध्य भारतातील अनेक भागांत पावसाची तूट निर्माण झाली आहे, अशी माहिती नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राचे वरिष्ठ वैज्ञानिक प्रवीण कुमार यांनी दिली. बहुतांश शेती क्षेत्रात पेरणी झाली असून, पिके चांगली आली आहेत. सध्या पावसाची अत्यंत गरज आहे. अधून मधून रिमझिम स्वरूपाचा पाऊस होईल, असा अंदाज हवामान केंद्राने व्यक्त केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

# विधानसभा अध्यक्षांनी केली घटनेची पायमल्ली

**● मुंबई । वीरभूमी –** शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर आज सुप्रीम कोर्टात महत्त्वाची सुनावणी पार पडली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वकील कपिल सिब्बल यांचा आज युक्तिवाद संपला. युक्तिवाद संपवत असताना कपिल सिब्बल यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी थेट घटनेची पायमल्ली केली आहे. मुळात खरी शिवसेना ठाकरेंचीच असून, धनुष्यबाण चिन्ह ठाकरेंना मिळत नसेल तर ते गोठवून टाकले पाहिजे, अशी मागणी केली.

दरम्यान, विधानसभा अध्यक्षांचा दृष्टिकोन कायद्याच्या विरोधात असेल, तर त्यांचा निर्णय रद्द करण्याचा अधिकार आम्हाला आहे, याबाबत आम्हाला कोणतीही शंका नाही. मात्र, त्यानंतरच्या परिणामी कारवाईत आम्ही स्वत: एकनाथ शिंदे यांना अपात्र ठरवू शकतो का, असा सवाल न्यायालयाने व्यक्त केला.

माझा विचारपूर्वक मांडलेला युक्तिवाद असा आहे आणि मी माननीय न्यायालयाला विनंती करतो की, शिवसेना हे नाव ठाकरे यांचेच आहे आणि शिंदे गटाला ते चिन्ह मिळू शकत नाही, असा निर्णय द्यावा. त्यांनी त्या चिन्हाचा लाभ घेतला आहे, याचा अर्थ त्यांच्या बाजूने कोणताही न्याय्य हक्क निर्माण होत नाही. हा चिन्हाचा अनधिकृत वापर करण्याचा प्रकार आहे. जर ते चिन्ह त्यांना मिळू शकत नसेल आणि आम्हालाही मिळू शकत नसेल तर ते चिन्ह गोठवले गेले पाहिजे. कारण ते नाव माझा हक्क आहे, अशा शब्दात कपिल सिब्बल यांनी शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत पहिल्यांदाच मोठी मागणी केली. कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद संपल्यानंतर ठाकरे गटाचेच वकील देवदत्त कामत यांनी युक्तिवाद सुरु केला. यावेळी त्यांना न्यायमूर्ती बागची यांनी महत्त्वाचा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी उत्तर दिले. विधानसभा अध्यक्ष चुकले असतील तर कोर्ट आम्हाला दिलासा देऊ शकते. विधिमंडळ पक्ष कोणत्याही निवडणुकीला उमेदवार उभा करत नाही. विधिमंडळ पक्ष निवडणुकीचा उमेदवार ठरवत नाही तर राजकीय पक्ष ठरवतात. विधिमंडळ पक्षावर सर्व अवलंबून राहण्यासाखे असेल तर इतर पर्यायांचा विचार केला पाहिजे, जो केला गेला नाही, असा युक्तिवाद केला.

आमदारांची टर्म संपली असली तरी आमदार अपात्रता प्रकरण महत्त्वाचे आहे. एकनाथ शिंदे पक्षात राहिले नाहीत तर त्यांच्याकडून होणारे दावे कसे राहतील, बंडखोरी झाली तेव्हा पक्ष कोण होता, हे खूप महत्त्वाचे आहे. पक्षाचे प्रमुख, सचिव या रचनेची शिंदेंनी पायमल्ली केली. विधिमंडळ पक्ष हा राजकीय पक्ष असल्याचा बचाव करू शकत नाही. अपात्रतेची कारवाई होत असताना विधिमंडळ पक्ष राजकीय पक्ष असल्याचे सांगून कारवाईपासून वाचू शकत नाही, असा युक्तिवाद निकम यांनी केला.

# साकळाई योजनेच्या ९६७ कोटींच्या कामाचे टेंडर प्रसिद्ध

## श्रीगोंदा-अहिल्यानगर तालुक्यातील ३२ गावांतील सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार : डॉ. सुजय विखे पाटील

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** नगर-अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेतील साकळाई उपसा सिंचन योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला आता वेग आला आहे. दीर्घकाळ कागदोपत्री प्रक्रिया, आश्वासने आणि प्रशासकीय अडथळ्यांमध्ये रखडलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेचे ९६७ कोटी रुपयांचे टेंडर प्रसिद्ध झाले आहे. पुढील दोन ते तीन महिन्यांत टेंडर प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता असून, सर्व प्रक्रिया मार्गी लागल्यास दिवाळीच्या मुहूर्तावर योजनेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, अशी माहिती डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

या योजनेमुळे अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील ३२ जिरायती गावांमधील सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे दुष्काळी भागातील शेतीला शाश्वत पाण्याचा आधार मिळण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीतही बदल होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

साकळाई योजनेची मुहूर्तमेढ पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांनी रोवली होती. जिरायती भागातील शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा मिळावी, दुष्काळी गावांचा कायापालट व्हावा आणि शेतीला शाश्वत पाण्याचा आधार मिळावा, या उद्देशातून या योजनेची संकल्पना पुढे आली. मात्र अनेक वर्षे सरकारे आणि लोकप्रतिनिधी बदलत राहिले तरी योजनेचा प्रश्न मार्गी लागत नव्हता. प्रत्येक निवडणुकीत साकळाईचा मुद्दा चर्चेत येत होता; मात्र निवडणुकीनंतर प्रक्रिया पुन्हा संथ होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती.

२०२२ नंतर या योजनेच्या प्रक्रियेला निर्णायक गती मिळाली. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी साकळाईचा विषय सातत्याने शासन दरबारी लावून धरत अधिकाऱ्यांच्या बैठका, प्रस्तावांचा पाठपुरावा, तांत्रिक अडचणी आणि सर्वेक्षणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी प्रयत्न केले. २०२४ मध्ये योजनेचे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर योजनेला प्रत्यक्ष आकार मिळण्याची आशा निर्माण झाली. तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचा अडथळा दूर

सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर योजनेसमोरील महत्त्वाचा प्रश्न होता तो पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचा. हा प्रश्न प्रलंबित राहिल्याने योजनेच्या पुढील प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांमध्ये पुन्हा संभ्रम निर्माण झाला होता. २०२४-२५



मध्ये जलसंपदा विभागाची जबाबदारी राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आल्यानंतर साकळाई योजनेच्या प्रक्रियेला पुन्हा वेग मिळाला. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका घेत योजनेतील अडथळे दूर करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता आणि १,२३४ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाल्याने योजनेच्या पुढील प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला.

साकळाई उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी ९६७ कोटी रुपयांचे टेंडर प्रसिद्ध झाल्याने योजनेने आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने पाऊल टाकले आहे. पुढील दोन ते तीन महिन्यांत टेंडर प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे. वनविभागासह अन्य संबंधित विभागांच्या आवश्यक मान्यतांसाठीही मागील महिन्यात टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. टेंडर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दिवाळीच्या मुहूर्तावर प्रत्यक्ष कामाचा श्रीगणेशा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून साकळाई योजनेच्या प्रत्यक्ष कामाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

१९५४ मध्ये घोड धरणासाठी केंद्रीय जल आयोगाने १०.४० टीएमसी पाणी साठ्याला मंजुरी दिली होती. मात्र प्रत्यक्षात धरणाची क्षमता ७.४० टीएमसी इतकी बांधण्यात आली. परिणामी दरवर्षी सुमारे तीन ते चार टीएमसी पाणी ओव्हरफ्लोच्या स्वरूपात वाहून जाते. या अतिरिक्त पाण्यापैकी १.८० टीएमसी पाणी साकळाई योजनेसाठी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आहे.

साकळाई योजनेचा इतिहास पाहता या मागणीसाठी अनेक वर्षे आंदोलने, निवेदने आणि बैठका झाल्या. प्रत्येक निवडणुकीत योजनेचा मुद्दा ऐरणीवर आला; मात्र प्रत्यक्ष काम सुरू झाले नव्हते.माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी खासदारकीच्या काळात सर्वेक्षण पूर्ण करून घेणे, प्रशासकीय पातळीवरील अडथळे दूर करणे आणि प्रस्तावाला गती देण्यासाठी पाठपुरावा केला. त्यानंतर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, शासन मान्यता आणि निधी मंजुरीच्या प्रक्रियेला गती दिली. या प्रक्रियेत माजी मंत्री बबनराव पाचपुते, स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले, विद्यमान आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार अक्षय कर्डिले यांनी सहकार्याची भूमिका घेतली.

साकळाई उपसा सिंचन योजनेचा लाभ अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील ३२ जिरायती गावांना अपेक्षित आहे. यामध्ये चिखली, कोरेगाव, घोसपुरी, सारोळा कासार, खडकी, जाधववाडी, वाळकी, शिरढोण, हिवरे झरे, बाबुर्डी बेंड, दहिगाव, साकत, वाटेफळ, देऊळगाव सिद्धी, तांदळी, बडगाव, रुई छत्तीसी, आंबिलवाडी, गुणवडी, गुंडेगाव, राळेगण, मांडवगण, मठ पिंप्री, हातवळण, खांडगाव, महांडूळवाडी, कोळगाव, सुरेगाव, घुटेवाडी, कोतुळ, बांगर्डा आणि कामठी या गावांचा समावेश आहे.

सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची अपेक्षा असल्याने साकळाई योजना पूर्ण झाल्यास या भागातील शेतीच्या चित्रात मोठा बदल होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या साकळाईच्या मागणीला आता प्रत्यक्ष कामाच्या रूपाने दिशा मिळते का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. साकळाई उपसा सिंचन योजनेला मिळालेल्या मंजुरी आणि पुढील प्रक्रियेला गती मिळाल्याबद्दल माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.


# ब्राम्हणी येथील प्राचीन मराठी शिलालेख सुतार कारागिरांच्या योगदानाची दुर्मीळ साक्ष

## बल्लाळेश्वर महादेव मंदिरातील तीन शिलालेखांतून प्राचीन मराठी भाषा, शैव भक्ती आणि कारागीरवर्गाचा इतिहास उजेडात

▪ विजय उंडे

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथील प्राचीन बल्लाळेश्वर महादेव मंदिराच्या सभामंडपात कोरलेले तीन शिलालेख मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, भाषिक आणि स्थापत्य इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत. विशेष म्हणजे, या शिलालेखांमध्ये राजे, सरदार किंवा मोठ्या दात्यांपेक्षा मंदिरनिर्मितीशी संबंधित सामान्य कारागिरांच्या नोंदी आढळत असल्याने त्यांना विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.









मंदिराच्या सभामंडपात उजव्या बाजूच्या स्तंभावर काटकोनात दोन शिलालेख, तर आडव्या वितानावर (तुळईवर) एक शिलालेख कोरलेला आहे. हे तिन्ही लेख कोरीव स्वरूपातील असून देवनागरी लिपीत मराठी भाषेत कोरलेले आहेत. वातावरणाचा परिणाम तसेच अनेक वर्षे झालेल्या रंगरंगोटीमुळे शिलालेखांवरील खोदीव अक्षरे मोठ्या प्रमाणात झाकली गेली आहेत. मात्र, शिलालेखांचा छाप घेतल्यानंतर अथक परिश्रम व प्रयत्नांनी त्यातील मजकूर वाचता आला आहे.

पहिला शिलालेख : शिवभक्त सुतार खापरा

शिलालेखाचे वाचन पुढीलप्रमाणे आहे–

**शिलालेख वाचन–१**

**१.सिवदासि**

**२.षापरा**

**३.सुतारु**

या लेखाचा अर्थ 'खापरा नावाचा सुतार, जो शिवाचा भक्त (दास) आहे,' असा होतो.

या नोंदीत 'शिवदास' या उल्लेखातून संबंधित व्यक्तीची भगवान शिवावरील श्रद्धा स्पष्ट होते. तसेच 'सुतार' या शब्दामुळे त्या व्यक्तीचा व्यवसायही स्पष्टपणे समोर येतो. त्यामुळे या छोट्याशा शिलालेखातून तत्कालीन समाजातील कारागीरवर्ग, त्यांचा व्यवसाय आणि धार्मिक जीवन यांची माहिती मिळते.

खापरा नावाच्या सुताराची नोंद मंदिराच्या वास्तूशी संबंधित काम करणाऱ्या स्थानिक कारागिरांच्या योगदानाचीही साक्ष देते. धार्मिक वास्तू उभारणीच्या प्रक्रियेत सुतारांसारख्या कुशल कारागिरांची भूमिका किती महत्त्वाची होती, याचा हा दुर्मीळ पुरावा मानला जातो.

दुसरा शिलालेख : 'शिवेश्वर गण' अशी ओळख

दुसऱ्या शिलालेखाचे वाचन पुढीलप्रमाणे–

**शिलालेख वाचन–२**

**१. भभाइ**

**२. सिवेस–**

**३. र गण**

**संहिता**

**१. भ(भा) इ**

**२. शिवेश्व**

**३. र गण**

या लेखाचा अर्थ 'भाइ हा शिवाचा गण (सेवक) आहे,' असा होतो.

'शिवेश्वर' आणि 'गण' या शब्दांमधून शैव भक्तीची परंपरा स्पष्टपणे दिसून येते. 'गण' म्हणजे भगवान शिवाचे सहचर किंवा सेवक. संबंधित व्यक्तीने स्वतःची ओळख शिवाच्या सेवेशी जोडल्याचे या नोंदीतून दिसते.

तसेच 'सिवेस–' किंवा 'शिवेश्वर' या लेखनरूपातून त्या काळातील मराठी भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास करण्यासाठीही महत्त्वपूर्ण भाषिक संदर्भ उपलब्ध होतो. अशा छोट्या वैयक्तिक नोंदी तत्कालीन समाजातील धार्मिक ओळख आणि स्थानिक भाषेच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात.

तिसरा शिलालेख : 'भाइ सुतरु'ची स्मरणनिधी

तिसऱ्या शिलालेखाचे वाचन–

**शिलालेख वाचन–३**

**१.भाइ सुतरु वचे सरगा पु**

या लेखातून 'भाई सुतार स्वर्गास जातो' असा अर्थ अभिप्रेत असल्याचे दिसते. यावरून संबंधित सुताराच्या निधनाची किंवा त्याच्या स्मरणाशी संबंधित नोंद असण्याची शक्यता व्यक्त होते.

या लेखातील 'सुतरु', 'सरगा' यांसारखी शब्दरूपे त्या काळातील बोलीभाषिक स्वरूपाचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाची आहेत. मृत्यूनंतर स्वर्गप्राप्तीची संकल्पना तत्कालीन धार्मिक श्रद्धांमध्ये प्रचलित असल्याचेही या नोंदीतून दिसून येते.

**सामान्य कारागिरांच्या इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा**

या तिन्ही शिलालेखांचा एकत्रित विचार केला असता, ब्राम्हणी येथील बल्लाळेश्वर महादेव मंदिराच्या निर्मिती व स्थापत्य प्रक्रियेत सुतारांसारख्या कारागिरांचा सहभाग असण्याची बाब अधोरेखित होते. मंदिरातील लाकडी बांधकाम, तुळया, वितान, सभामंडपाची रचना आणि इतर स्थापत्य घटकांच्या निर्मितीत सुतारांची भूमिका महत्त्वाची असणे स्वाभाविक आहे.

विशेष म्हणजे, या नोंदींमध्ये राजे, सरदार किंवा प्रतिष्ठित दाते यांच्याऐवजी सामान्य कारागिरांची नावे आणि धार्मिक ओळख जतन झालेली दिसते. त्यामुळे या शिलालेखांकडे केवळ धार्मिक लेख म्हणून न पाहता मध्ययुगीन कारागीरवर्गाच्या सामाजिक इतिहासाचे प्राथमिक स्रोत म्हणून पाहणे आवश्यक ठरते.

मंदिरांचा इतिहास सांगताना साधारणपणे दाते, राजे आणि मंदिरसंस्थांचा उल्लेख केला जातो. मात्र प्रत्यक्ष मंदिर उभारणारे शिल्पकार, सुतार, गवंडी आणि इतर कारागीर यांचे योगदान अनेकदा इतिहासाच्या नोंदीत दुर्लक्षित राहते. ब्राम्हणी येथील हे शिलालेख या सामान्य कारागिरांच्या योगदानाला ऐतिहासिक अधिष्ठान देतात.

**प्राचीन मराठी भाषेच्या अभ्यासासाठीही महत्त्वपूर्ण**

देवनागरी लिपीत मराठी भाषेत कोरलेले हे लेख प्राचीन मराठीच्या भाषिक स्वरूपाचा अभ्यास करण्यासाठीही उपयुक्त ठरू शकतात. 'सुतारु', 'सरगा', 'सिवदासि', 'सिवेस' यांसारख्या शब्दरूपांतून तत्कालीन भाषेतील ध्वनी, शब्दरचना आणि बोलीभाषिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करता येतो.

त्यामुळे ब्राम्हणी येथील बल्लाळेश्वर महादेव मंदिरातील हे तीन शिलालेख धार्मिक इतिहासासोबतच प्राचीन मराठी भाषा, शैव भक्ती, स्थानिक समाजरचना, कारागीरवर्ग आणि मध्ययुगीन स्थापत्य परंपरेच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे ठरतात.

या शिलालेखांचे दस्तऐवजीकरण, शास्त्रीय वाचन, छायाचित्रण आणि संवर्धन होणे गरजेचे आहे. मंदिरावर करण्यात येणाऱ्या रंगरंगोटीमुळे अशा प्राचीन लेखांवरील अक्षरे झाकली जाण्याची शक्यता असल्याने भविष्यात या ऐतिहासिक वारशाचे जतन करण्याकडे संबंधित यंत्रणांनी विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

या शिलालेखाचे वाचना अथर्व पिंगळे व अनिल दुधाणे यांनी केले आहे त्यांना सोमनाथ बनकर, रोहित पाटोळे व आकाश जाधव यांनी सहकार्य केले आहे.

---

SPOT NEWS

## शेवगावात २३ ऑगस्टला पालकांसाठी मार्गदर्शन सत्र

**● शेवगाव । वीरभूमी –** मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच त्यांच्यात आत्मविश्वास, जबाबदारीची जाणीव आणि यशस्वी होण्याची वृत्ती निर्माण करण्यासाठी शेवगाव फ्रेंड्स सर्कलच्या वतीने पालकांसाठी २३ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ट्रेनर व प्रेरणादायी वक्ते मुनावर जमा हे पालकांना 'मुलांना यशस्वी आणि जबाबदार कसे बनवावे' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. हे सत्र रविवार, २३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता बंधन लॉन्स, शेवगाव येथे होणार आहे. मुलांचे भविष्य घडविताना पालकांची भूमिका, मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, जबाबदारीची जाणीव वाढविणे तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सकारात्मक विकास करण्यासंदर्भात या सत्रात मार्गदर्शन केले जाणार आहे. पालकांसाठी हे सत्र उपयुक्त ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

---

## पाथर्डीत २६ ऑगस्टला राज्यस्तरीय 'नगराध्यक्ष चषक' रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा

**● पाथर्डी । वीरभूमी–** आनंद चेस क्लब, पाथर्डी यांच्या वतीने तसेच अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने 'नगराध्यक्ष चषक' भव्य राज्यस्तरीय रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पाथर्डी येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात होणार आहे.

बुद्धिबळ क्षेत्रातील खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत बिलो १९०० रेटिंग असलेल्या खेळाडूंना सहभागी होता येणार आहे. स्पर्धेसाठी एकूण सुमारे ४६ हजार २०० रुपयांची रोख बक्षिसे ठेवण्यात आली असून विविध गटांतील विजेत्या खेळाडूंना आकर्षक रोख पारितोषिकांसह चषक व पदके देण्यात येणार आहेत.

स्पर्धेतील बेस्ट बिलो १९०० रेटिंग गटात प्रथम क्रमांकासाठी ७ हजार ५०१ रुपये, द्वितीय ५ हजार १ रुपये, तृतीय ३ हजार १ रुपये, चतुर्थ २ हजार १ रुपये, पाचवा १ हजार ५०१ रुपये, सहावा १ हजार १ रुपये, सातवा ७०१ रुपये, तर आठवा, नववा व दहाव्या क्रमांकासाठी प्रत्येकी ५०१ रुपयांचे बक्षीस आहे. याशिवाय बेस्ट पाथर्डी गटात प्रथम ३ हजार १ रुपये, द्वितीय २ हजार ५०१ रुपये, तृतीय २ हजार १ रुपये, चतुर्थ १ हजार ५०१ रुपये, पाचवा १ हजार १ रुपये व इतर पारितोषिक देण्यात येणार आहे. यासह या स्पर्धेत आणखी काही आकर्षक रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. त्यामुळे पाथर्डीसह शेवगाव आणि इतर तालुक्यांतील बुद्धिबळपटूंना या स्पर्धेत सहभागी होण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

---

## पाथर्डी बाजार समितीच्या कारभाराची सखोल चौकशी करा : गोरक्ष ढाकणेंची मागणी

### कथित भ्रष्टाचार व अनियमिततेची स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कारवाई करा

**● पाथर्डी । वीरभूमी–** पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीतील कथित भ्रष्टाचार, अनियमितता व नियमबाह्य कारभाराची सखोल व स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निर्भय महाराष्ट्र पार्टीचे तालुकाध्यक्ष गोरक्ष पांडुरंग ढाकणे यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बाजार समितीतील गाळे व जागा वाटप, भाडेवसुली, पावती पुस्तके, बँक व्यवहार, बांधकाम, लेआउट, गाळे–जागांची मोजणी, अतिक्रमणे तसेच शासकीय मोजणीसह विविध व्यवहारांची प्रत्यक्ष कागदपत्रांच्या आधारे तपासणी करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. बाजार समितीच्या जागेवरील अतिक्रमणे, नियमबाह्य वाटप, भाडेकरार व गाळे हस्तांतरणाचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बाजार समितीतील संशयास्पद बांधकामांची तांत्रिक व आर्थिक तपासणी करून आवश्यक असल्यास विशेष लेखापरीक्षण (स्पेशल ऑडिट) करावे. तसेच चेकद्वारे जमा झालेल्या रकमेचा प्रत्यक्ष वापर, बाजार समितीच्या शेडवरील गेटची देखभाल व शुल्कवसुली, विविध कामांसाठी काढण्यात आलेली बिले आणि संबंधित शासकीय कागदपत्रांची पडताळणी करावी, अशी मागणीही ढाकणे यांनी केली आहे.

स्वतंत्र चौकशी अधिकारी नेमून बाजार समितीची शासकीय मोजणी करावी व प्रत्येक गाळा आणि जागेची हद्द निश्चित करावी. आर्थिक गैरव्यवहार अथवा अपहार आढळल्यास संबंधितांकडून रक्कम वसूल करून कायदेशीर कारवाई करावी. तसेच चौकशीचा अंतिम अहवाल व करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

ढाकणे यांनी बाजार समितीच्या कारभारातील विविध मुद्द्यांकडे लक्ष वेधल्याने बाजार समिती वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, या प्रकरणाबाबत विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत.

---

# श्रावण महिन्यानिमित्त पीएनजी ज्वेलर्सकडून पारंपरिक 'मंगळसूत्र महोत्सव'

## पारंपरिक सोन्याच्या मंगळसूत्रांपासून आधुनिक डायमंड डिझाइन्सपर्यंत, परंपरा आणि दैनंदिन आकर्षकता यांचा सुंदर संगम असलेला विस्तृत संग्रह सादर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** भारतीय वैवाहिक परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक असलेल्या मंगळसूत्राचे सांस्कृतिक महत्त्व जपत, पीएनजी ज्वेलर्सने आपल्या बहुप्रतीक्षित 'मंगळसूत्र महोत्सवा'ची घोषणा केली आहे. हा महोत्सव १३ ऑगस्ट ते १३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत भारतातील सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूममध्ये सुरू असणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीय महिलांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेऊन, परंपरेचा वारसा जपत विविध शैलींतील मंगळसूत्रांचा सर्वाधिक वैविध्यपूर्ण आणि आकर्षक संग्रह ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून 'मंगळसूत्र महोत्सव' हा पीएनजी ज्वेलर्सचा एक वैशिष्ट्यपूर्ण वार्षिक उपक्रम म्हणून ओळखला जातो. या महोत्सवात पारंपरिक, आधुनिक तसेच हलक्या वजनाच्या मंगळसूत्रांचा विस्तृत संग्रह उपलब्ध असून, सणासुदीच्या प्रसंगांपासून ते दैनंदिन वापरापर्यंत प्रत्येक गरज पूर्ण करणाऱ्या विविध डिझाइन्स ग्राहकांना पाहायला मिळतील. यंदाच्या संग्रहात आकर्षक सोन्याची मंगळसूत्रे, सॉलिटेअर–प्रेरित डायमंड मंगळसूत्रे, दैनंदिन वापरासाठी उपयुक्त मिनिमलिस्ट डिझाइन्स तसेच व्यक्तिमत्त्वाला अधिक उठाव देणाऱ्या आधुनिक शैलीतील मंगळसूत्रांचा समावेश करण्यात आला आहे.



सर्व वयोगटातील विवाहित महिलांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन साकारण्यात आलेला हा संग्रह, श्रावण महिन्याच्या निमित्ताने पत्नी, सून किंवा कुटुंबातील महिलांना अर्थपूर्ण भेट देऊ इच्छिणाऱ्या पती आणि कुटुंबीयांसाठीही एक उत्तम पर्याय ठरणार आहे. उत्कृष्ट कारागिरी आणि परवडणाऱ्या किमतीचा समतोल साधत, विविध शैली, आवडीनिवडी आणि बजेटनुसार मंगळसूत्रांची निवड करण्याची संधी या महोत्सवातून ग्राहकांना मिळणार आहे.

या महोत्सवादरम्यान ग्राहकांना मंगळसूत्रांच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेस केवळ ७.९९% पासून उपलब्ध असतील. ही विशेष ऑफर १३ सप्टेंबर २०२६ पर्यंत मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध असेल. त्यामुळे परंपरा, प्रेम आणि वैवाहिक बंधाचे प्रतीक असलेले मंगळसूत्र आकर्षक ऑफर्ससह खरेदी करण्याची ही सुवर्णसंधी आहे.

याबाबत बोलताना पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, भारतीय संस्कृतीत मंगळसूत्राला नेहमीच भावनिक आणि पारंपरिक महत्त्व लाभले आहे. मात्र आजच्या महिला ते केवळ परंपरेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि शैलीचाही एक भाग म्हणून आत्मविश्वासाने परिधान करत आहेत. पीएनजी ज्वेलर्समध्ये आम्ही मंगळसूत्राचे सांस्कृतिक महत्त्व जपत, आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत आणि बदलत्या आवडीनिवडींना अनुरूप डिझाइन्स सादर करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहोत. 'मंगळसूत्र महोत्सवा'च्या माध्यमातून आम्ही देशातील सर्वाधिक वैविध्यपूर्ण संग्रह ग्राहकांसमोर सादर करत आहोत, ज्यामध्ये परंपरेशी नाळ जपणाऱ्या तसेच आधुनिकतेचा स्वीकार करणाऱ्या प्रत्येक महिलेला तिच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे मंगळसूत्र निवडण्याची संधी मिळेल. हा महोत्सव म्हणजे परंपरा, आधुनिकता आणि वैयक्तिक अभिव्यक्ती यांचा सुंदर संगम आहे.

जवळपास दोन शतकांचा विश्वास आणि उत्कृष्ट कारागिरीचा वारसा लाभलेल्या पीएनजी ज्वेलर्सने भारतीय संस्कृतीशी असलेले आपले नाते जपत विविध दागिन्यांच्या श्रेणींमध्ये सातत्याने नावीन्यपूर्ण डिझाइन्स सादर केले आहेत. 'मंगळसूत्र महोत्सवा'सारख्या उपक्रमांद्वारे उत्कृष्ट डिझाइन्स, वैविध्यपूर्ण संग्रह आणि ग्राहकांना सर्वोत्तम मूल्य देण्याची आपली बांधिलकी पीएनजी ज्वेलर्स पुन्हा अधोरेखित करत आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com


# श्रीगोंदेकरांसाठीच्या विसापूर, कुकडीचे वाटोळे झाले... आता ‘घोड’ ही त्याच रांगेत

## साकळाई योजना घोडखालील शेतकऱ्यांना भविष्यात मारक मात्र आ. विक्रम पाचपुतेंची चुप्पी...!

■ **विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

सीना प्रकल्प होताना धरणातील ओव्हरफ्लोचे पाणी या गोंडस नावाखाली हा प्रकल्प उभा राहिला मात्र प्रकल्प झाल्यानंतर कुकडीचे एक आवर्तन या प्रकल्पाने जिरवले. श्रीगोंदा तालुक्यात आवर्तन केवळ सात ते दहा दिवस पळपळ करीत फिरवले जाते. त्यामुळे कुकडी लाभक्षेत्राखालील शेतकऱ्यांच्या पदरी पूर्णपणे निराशा आली आहे. पिंपळगाव पिसा येथील बहुचर्चित हंगा जलसेतू झाल्यानंतर विसापूर धरणाखालील शेतकऱ्यांना बुरे दिन आले. हंगा जलसेतू होण्याच्या अगोदर सुजलाम् सुफलाम् असणाऱ्या शेतीचे आज मात्र वाळवंट झाले आहे. कुकडी व विसापूरच्या तुलनेत घोड लाभक्षेत्राखालील शेतकऱ्यांचे आलबेल चालले असताना त्यांच्या मानगुटीवर साकळाई योजनेचे भूत बसवले आहे.









साकळाई योजना होण्याला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. साकळाई योजनेसाठी जी तत्परता शासनकर्त्यांनी दाखवली. ती तत्परता गेल्या ३५ वर्षांपासून श्रीगोंदा, कर्जत, करमाळा, पारनेर या तालुक्यांची डिंभे ते माणिकडोह बोगद्यासाठी मागणी असताना ती शासनकर्त्यांकडून का होत नाही. घोडच्या ओव्हरफ्लो पाण्यावर साकळाई योजना होणार आहे. असा शासनकर्त्यांनी गोंडस नावाचा शब्दप्रयोग केला आहे. सीना प्रकल्पाप्रमाणे भविष्यात घोडचे एक आवर्तन हा प्रकल्प गिळंकृत करणार आहे. महाराष्ट्रात बारमाही असणारे घोड धरण आठमाहीवर येणार आहे. या गंभीर प्रश्नाकडे श्रीगोंदा तालुक्यातील सगळ्याच नेत्यांनी राजकीय दबावामुळे चुप्पी धरणे पसंद केले आहे.

पिंपळगाव पिसा येथील हंगा जलसेतू होण्याअगोदर विसापूर धरण पूर्ण भरायचे, मग श्रीगोंदा, कर्जत व करमाळा या भागात आवर्तनासाठी पाणी पुढे जायचे. मात्र पिंपळगाव पिसा येथील हंगा जलसेतू झाल्यानंतर विसापूर धरणात पाणी न जाता खालील भागात पाणी थेट जाऊ लागले. हंगा जलसेतू झाल्यानंतर विसापूर धरणाखालील दहा- बारा गावे परावलंबी होत गेली. हक्काच्या विसापूर धरणात पाणी येण्यास टाळाटाळ होऊ लागली. कधीकधी विसापूर धरण हे कुकडी प्रकल्पांतर्गत येतच नाही अशी आवई उठवण्यात आली. विसापूर धरणाच्या जीवावर चालणाऱ्या शेतीचे केवळ हंगा जलसेतू झाल्यामुळे वाळवंट झाले. याची राजकीय किंमत त्यासाठी पुढाकार घेतलेल्या नेत्यांना भोगावी लागली.

घोड धरण हे साडेसात टीएमसीचे असताना त्यात गाळ दोन टीएमसीच्या वर साठला आहे. रांजणगाव – कारेगाव एमआयडीसीसाठी रोज मोठ्या प्रमाणात पाणी चालू आहे. गावोगावच्या पाणी योजनाही घोड धरणावरून झाल्या आहेत. हा पाण्याचा मोठा उपसा चालू असताना घोडच्या मुळावर साकळाई योजना आली आहे. घोड धरणाची उंची वाढवल्यास शिरूर शहर पाण्याखाली जाऊ शकते. घोड धरणातील गाळ काढण्याबाबत शासनाची उदासीनता आहे. मात्र साकळाई योजना होण्यासाठी घाईघाईने टेंडर काढून शासनकर्त्यांनी उत्सुकता दाखवली आहे.

### लोकसभा निवडणुकीत मताधिक्य न मिळाल्याने वचपा की खरोखरच साकळाई योजनेवर प्रेम..!!

■ लोकसभा निवडणुकीत डॉ. सुजय विखे यांचा पराभव झाला. त्यात श्रीगोंद्यातून मोठ्या प्रमाणात मताधिक्य खा. निलेश लंके यांना मिळाले. हा पराभव विखेंच्या जिव्हारी लागला. योगायोगाने पुढे ना. राधाकृष्ण विखे पाटबंधारे मंत्री झाले आणि साकळाई योजनेने गती घेतली. या योजनेला लोकसभा निवडणूक निकालाची किनार असल्याचे घोड खालील शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे.

### विधानसभेत राष्ट्रीय प्रश्न मांडत असताना आ. पाचपुते यांनी ‘घोड’ कडेही लक्ष द्यावे

■ आ. विक्रम पाचपुते विधानसभा सदस्य झाल्यानंतर विधानसभेत जोशात भाषणे ठोकत आहेत. अनेक राष्ट्रीय प्रश्नांना हात घालत त्यांनी त्यांचे नाव चर्चेत ठेवले आहे. मात्र घोड लाभक्षेत्राखालील गावांनी त्यांना भरघोस मते देऊन विधानसभेत पाठवले. घोड लाभक्षेत्राखालील शेतीचे वाळवंट उंबरठ्यावर असताना आ. विक्रम पाचपुते मात्र चुप्पी धरून आहेत. विसापूर लाभक्षेत्राखालील शेतकऱ्यांच्या रोषाला माजी मंत्री बबनराव पाचपुते यांना १९९९ व २०१४ साली ज्याप्रमाणे सामोरे जावे लागले त्याचप्रमाणे आ. विक्रम पाचपुते यांनाही घोड खालील शेतकऱ्यांच्या रोषाचा सामना भविष्यात करावा लागल्यास नवल वाटायला नको.

## SPOT NEWS

### पाथर्डीत भरदुपारी वाहनाच्या डिकीतून महिला बचत गटाची ७० हजारांची रोकड लंपास

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहरात भरदुपारी वाहनाच्या डिकीत ठेवलेली ७० हजार रुपयांची रोकड लंपास झाल्याची घटना बुधवारी (दि. १९) घडली. याप्रकरणी श्रीकृष्ण बचत गटाच्या अध्यक्षा अश्विनी दीपक गोळक यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, अश्विनी गोळक या गेल्या दोन वर्षांपासून श्रीकृष्ण बचत गटाचे कामकाज पाहत आहेत. बुधवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास त्यांना वैयक्तिक कर्जासाठी ७० हजार रुपयांची आवश्यकता होती. त्यामुळे बचत गटाच्या सदस्यांनी जमा केलेल्या रकमेतून ७० हजार रुपयांचा धनादेश घेऊन त्यांनी बँक ऑफ महाराष्ट्रच्या शेवगाव रोड शाखेतून रोकड काढली. बँकेतून पैसे काढल्यानंतर त्या संबंधित व्यक्तीकडे रेकॉर्ड दाखविण्यासाठी गेल्या. त्यानंतर दुपारी सुमारे १२.४० वाजता नगरपालिकेकडे भरणा करण्यासाठी जात असताना त्यांनी वाहनाची डिकी उघडून पाहिली. त्यावेळी पैसे ठेवलेली पर्स डिकीत दिसून आली नाही. या पर्समध्ये ७० हजार रुपये रोख असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पर्स चोरीस गेल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी संबंधित व्यक्तींकडे चौकशी केली तसेच परिसरात शोध घेतला. मात्र पर्स अथवा रोकड मिळून आली नाही. अखेर रोकड चोरीस गेल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. अज्ञात चोरट्याने वाहनाच्या डिकीतून पर्स चोरून नेल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले आहे. घटनेमुळे भरदुपारी वाहनातून रोकड लंपास झाल्याने शहरातील नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून चोरट्याचा शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### पाथर्डीच्या आठवडे बाजारातून १.८५ लाखांचा मोबाईल चोरीला; अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा

**● पाथर्डी । वीरभूमी –**

आठवडे बाजारात भाजीपाला खरेदीसाठी आलेल्या व्यावसायिकाच्या शर्टच्या खिशातून १ लाख ८४ हजार ९९९ रुपये किमतीचा सॅमसंग फोल्ड-७ मोबाईल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी दुपारी घडली. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भगवान हनुमंत दराडे (वय ५८, रा. मेहरेवाडी, पाथर्डी) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. दराडे हे १९ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे १२ वाजता गावचा आठवडे बाजार असल्याने नगरपालिकेसमोरील भाजीबाजार परिसरात गेले होते. त्यावेळी त्यांनी मोबाईल शर्टच्या वरच्या खिशात ठेवला होता. त्यानंतर दुपारी सुमारे १ वाजता ते पुन्हा नगरपालिकेजवळ आले. मुलगा कैलास याला फोन करण्यासाठी त्यांनी खिशात हात घातला असता मोबाईल आढळून आला नाही. त्यांनी आजूबाजूच्या परिसरात तसेच बाजारात शोध घेतला; मात्र मोबाईल मिळून आला नाही. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने शर्टच्या खिशातून मोबाईल चोरून नेल्याचे दराडे यांनी फिर्यादीत नमूद केले आहे. चोरीस गेलेल्या मोबाईलची किंमत १ लाख ८४ हजार ९९९ रुपये असून, तो सॅमसंग कंपनीचा फोल्ड-७ मॉडेल आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; एकावर गुन्हा दाखल

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील एका गावातील १४ वर्षीय नववीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीला वस्तीगृहातुन बोलवून घेऊन दुचाकीवरून बाहेर घेऊन जाऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून युवक अंजाबापू महादेव सरग याच्याविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांकडुन मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणाची मुलीशी काही महिन्यांपूर्वी तिच्या कुटुंबाच्या शेतातील कामाच्या निमित्ताने ओळख झाली होती. त्यानंतर तो तिच्याशी मोबाईलवरून संपर्क साधत असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दि. १५ ऑगस्ट रोजी शाळेतील ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाल्यानंतर मुलगी वसतिगृहात गेली होती. त्यावेळी संबंधित तरुणाने तिला फोन करून बाहेर बोलावून घेतले. त्यानंतर दुचाकीवरून तिला शहरालगतच्या एका परिसरात नेऊन तिच्यावर बळजबरीने अत्याचार केल्याचा आरोप मुलीने फिर्यादीत केला आहे. या वेळी विरोध केल्यावर तिला व तिच्या आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. घटनेनंतर मुलगी वसतिगृहात परतल्यानंतर वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना संशय आल्याने तिची विचारपूस करण्यात आली. त्यानंतर पालकांना बोलावून घेण्यात आले. पालकांनी विचारणा केल्यानंतर मुलीने घडलेला प्रकार सांगितल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी १८ ऑगस्ट रोजी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून, पोलिसांनी अंजाबापू महादेव सरग या संशयिताविरुद्ध कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहन खंडागळे हे तपास करत आहे. पोलिसांनी अंजाबापू सरग याला अटक केली आहे.

## मराठा महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्यावर कारवाईची मागणी

### अखंड मराठा समाज व संभाजी ब्रिगेडची श्रीगोंदा पोलिसांकडे तक्रार

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

मराठा समाजातील महिलांबाबत आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्य करून समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप करत नवनाथ वाघमारे यांच्याविरोधात अखंड मराठा समाज व संभाजी ब्रिगेडच्या श्रीगोंदा तालुका पदाधिकाऱ्यांनी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित वक्तव्याची चौकशी करून दोषी आढळल्यास भारतीय न्याय संहितेसह लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.




तक्रारीनुसार, संबंधित व्यक्तीने सार्वजनिकरित्या तसेच विविध माध्यमांतून मराठा समाजातील महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप आहे. या वक्तव्यामुळे समाजातील महिला व नागरिकांच्या भावना दुखावल्या असून, अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे सामाजिक तेढ व वैमनस्य निर्माण होण्याची शक्यता असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणातील संबंधित व्हिडिओ, ऑडिओ रेकॉर्डिंग, सोशल मीडिया पोस्ट तसेच विविध माध्यमांतून प्रसारित झालेल्या सामग्रीची सखोल चौकशी करून त्याची सत्यता पडताळावी, अशी मागणीही पोलिसांकडे करण्यात आली आहे. वक्तव्याची कायदेशीर तपासणी करून लागू असलेल्या कायद्यांनुसार योग्य ती कारवाई करावी, असे तक्रारदारांनी म्हटले आहे.

महिलांचा सन्मान आणि सामाजिक सलोखा अबाधित ठेवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. कोणत्याही समाजातील महिला किंवा नागरिकांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करून सामाजिक वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला. पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे अहिल्यानगर जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. शामभाऊ जरे, तालुकाध्यक्ष दिलीप लबडे, आम आदमी पार्टीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र निळकंठ नागवडे, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक आनंद औटी, आनंद लगड, कचरू वागसकर यांच्यासह अखंड मराठा समाज व संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## फोटोग्राफीमध्ये ‘एआय’चा प्रभावी वापर काळाची गरज

### जागतिक छायाचित्र दिनानिमित्त शेवगावात रिस्पेक्ट फाउंडेशनतर्फे एकदिवसीय कार्यशाळा

**● शेवगाव । वीरभूमी–**

फोटोग्राफी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा झपाट्याने प्रवेश होत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (एआय) योग्य व प्रभावी वापर केल्यास छायाचित्रणाची गुणवत्ता, सर्जनशीलता आणि व्यवसायाला नवी दिशा मिळू शकते. त्यामुळे काळानुरूप बदल स्वीकारून छायाचित्रकारांनी एआय तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन रिस्पेक्ट फाउंडेशन ऑफ वेडिंग फोटोग्राफर्सचे प्रमुख व मार्गदर्शक, उत्कृष्ट छायाचित्रकार राम नाईक यांनी केले.



जागतिक छायाचित्र दिनानिमित्त रिस्पेक्ट फाउंडेशन ऑफ वेडिंग फोटोग्राफर्सच्या वतीने बुधवार (ता. १९) रोजी शेवगाव येथील कॅम आर्ट्स येथे ग्रामीण व शहरी भागातील छायाचित्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ‘फोटोग्राफीमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर कसा करावा’ या विषयावर राम नाईक यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी निखिल गायकवाड, महादेव बढे, प्रमोद लोळगे आदी उपस्थित होते.

नाईक म्हणाले की, छायाचित्रणामध्ये केवळ कॅमेरा हाताळण्याचे कौशल्य पुरेसे राहिलेले नाही. आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती, त्याचा योग्य वापर आणि सर्जनशीलतेची सांगड घालणे आवश्यक आहे. छायाचित्रांची गुणवत्ता वाढविणे, फोटो एडिटिंग अधिक प्रभावी करणे, वेळेची बचत करणे तसेच ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी एआयचा योग्य पद्धतीने वापर करता येतो. मात्र, तंत्रज्ञानाचा वापर करताना छायाचित्रकाराची कल्पकता, कलात्मकता आणि कौशल्य जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

एआय हे छायाचित्रकारांची जागा घेणारे तंत्रज्ञान नसून, त्यांच्या कलेला अधिक प्रभावी बनविणारे आधुनिक साधन आहे. ग्रामीण भागातील छायाचित्रकारांनीही नव्या तंत्रज्ञानाची भीती न बाळगता त्याचा अभ्यास करून व्यवसायात त्याचा उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यशाळेमुळे ग्रामीण व शहरी भागातील छायाचित्रकारांना फोटोग्राफीच्या बदलत्या स्वरूपाची तसेच भविष्यातील तंत्रज्ञानाची दिशा समजण्यास मदत झाली. फोटोग्राफी व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन नवीन संधी निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरल्याची भावना भागवत तारक, सोनू काटे, नितीन जवंजाळ, अक्षय मुंगसे या उपस्थित छायाचित्रकारांनी व्यक्त केली.

कार्यशाळेस रिस्पेक्ट फाउंडेशनशी संबंधित अनेक छायाचित्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक छायाचित्रकार निखिल गायकवाड यांनी केले.

# नगर-मनमाड महामार्ग आणि ट्रम्प विधानावर डॉ. सुजय विखे पाटील ठाम!

## विरोधकांना थेट प्रत्युत्तर, पुराव्यांसह मांडली भूमिका । दारूबाबतच्या वक्तव्याचा विपर्यास झाल्याने ते मागे घेतो : सुजय विखे पाटील

**● शिर्डी । वीरभूमी–**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यावर मी ठाम आहे. अभ्यासूपणे केलेले हे वक्तव्य विरोधकांना न समजल्याने व तेवढा अभ्यास त्यांचा नसल्याने राजकीय पोळी भाजण्यासाठी ते रान उठवत आहेत. या प्रश्नावर मला विरोधकांना उत्तर देण्याची गरज नाही, परंतु जनतेला उत्तर देणे माझे दायित्व आहे. रस्त्याच्या कामांना युद्धजन्य परिस्थिती व डोनाल्ड ट्रम्प हेच जबाबदार असल्याचे वक्तव्यावर मी आजही ठाम असल्याचा पुनरुच्चार करत दारू पिणाऱ्यांची संख्या वाढली हे वक्तव्य मी मार्मिक व मिश्किलपणे केले होते. याचा अर्थ काहींनी वेगळा काढला आहे, हे मिस्कील वक्तव्य मी मागे घेत असल्याचे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी शिर्डी येथे पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेत शिर्डी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात, प्रथम नगराध्यक्ष कैलासबापू कोते, राजेंद्र गोंदकर यांच्यासह नगर परिषदेच्या नगरसेविका व नगरसेवक उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कार्यपद्धतीमुळे युद्ध लादल्याने डांबराची उपलब्धता व आयात कमी झाली. डांबर आयातीवर संकट आले. त्यामुळे देशातील अनेक रस्त्यांची कामे थांबली. त्यात अहिल्यानगर – मनमाड या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुद्धा संथ गतीने होत आहे. अमेरिकेच्या युद्ध धोरणामुळे पश्चिम आशियातून डांबराचा पुरवठा घटला, दर वाढले आणि त्याचा परिणाम देशातील रस्त्यांच्या कामांवर झाला,' या आपल्या आधीच्या वक्तव्यावर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील ठाम राहिले आहेत. 'मी प्रत्येक वाक्य पूर्ण अभ्यास करून बोलतो. माझ्या वक्तव्याला अधिकृत आकडेवारी, शासकीय पत्रे आणि परदेशी व भारतातील विविध वृत्तपत्रांतील वृत्तांचे आधार आहेत. त्यामुळे मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले. नगर-मनमाड रस्त्याच्या रखडलेल्या कामावरून विरोधकांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना त्यांनी आक्रमक भूमिका मांडली.



भारताला दरवर्षी सुमारे ९० लाख मेट्रिक टन डांबराची गरज भासते. त्यातील सुमारे निम्मे डांबर देशांतर्गत तेलशुद्धीकरण कारखान्यांमध्ये तयार होते, तर उर्वरित डांबर इराक, संयुक्त अरब अमिराती, इराण आणि बहरीन या देशांतून आयात केले जाते, असा दावा डॉ. विखे यांनी केला. युद्धजन्य परिस्थितीमुळे या देशांतून होणाऱ्या डांबराच्या आयातीवर मोठा परिणाम झाला असून, आयातीत सुमारे ७८ टक्क्यांची घट झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

### डांबराचे दर ४८ हजारांवरून ८३ हजार ६५२ रुपये

डांबराच्या दरवाढीची आकडेवारीही त्यांनी मांडली. फेब्रुवारी २०२६मध्ये प्रति मेट्रिक टन सुमारे ४८ हजार रुपये असलेला डांबराचा दर काही महिन्यांत वाढून ८३ हजार ६५२ रुपयांवर पोहोचला. त्यामुळे दरात सुमारे ७१ टक्क्यांची वाढ झाली आहे. डांबराच्या वाढलेल्या दरामुळे रस्त्यांच्या कामांवर परिणाम झाला असून, केंद्र सरकारने कंत्राटदारांना वाढीव दर देण्यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या वक्तव्याच्या समर्थनार्थ केंद्र सरकारची अधिकृत आकडेवारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची पत्रे तसेच विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांतील वृत्तांचे दाखले त्यांनी दिले. 'विरोधकांनी आधी जागतिक घडामोडींचा अभ्यास करावा आणि मगच टीका करावी,' असा टोला त्यांनी लगावला.

दारूसंदर्भात केलेल्या वक्तव्यावरून झालेल्या वादावरही डॉ. विखे यांनी स्पष्टीकरण दिले. ते विधान मार्मिक आणि उपहासात्मक शैलीत केले होते; मात्र त्याचा विपर्यास करण्यात आला. कोणाच्या भावना दुखावल्या असतील, तर त्या वक्तव्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून ते शब्द मागे घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### निवडून दिलेल्यांनी हात वर केले म्हणून मला रस्त्यावर उतरावे लागले

नगर-मनमाड महामार्गाच्या दुरवस्थेवरून सुरू असलेल्या राजकीय टीकेलाही डॉ. विखे यांनी थेट प्रत्युत्तर दिले. 'माझे कोणाशीही वैयक्तिक वैर नाही. मात्र जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी हात वर केल्यामुळे आज निवडणुकीत पराभूत झालेल्या माणसाला जनतेच्या हितासाठी रस्त्यावर उतरून हे काम हाती घ्यावे लागत आहे,' असा घणाघात त्यांनी केला. रस्त्याच्या कामात दिरंगाई झाली असून काही ठिकाणी कामाच्या गुणवत्तेबाबत तक्रारी आहेत आणि रस्ता खचल्याच्या तक्रारीही खऱ्या असल्याचे त्यांनी मान्य केले. 'ठेकेदार माझा नातेवाईक नाही. मात्र जनतेला होणारा त्रास लक्षात घेऊन त्याच्याकडून दर्जेदार काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी मी स्वतः घेतली आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

### ठेकेदारावर कारवाई केली तर रस्ता कोण पूर्ण करणार?

रस्त्याच्या कामाची चौकशी करून ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या विरोधकांनाही त्यांनी सवाल केला. 'राहात्यातील काही नेते चौकशी लावण्यासाठी आणि गुन्हे दाखल करण्यासाठी केंद्राला चार-चार पानी पत्रे पाठवत आहेत. ठेकेदारावर कारवाई होऊन तो काम सोडून गेला, तर उर्वरित रस्ता हे नेते स्वतः पूर्ण करून देणार आहेत का? याचे उत्तर त्यांनी आधी जनतेला द्यावे,' असे आव्हान त्यांनी दिले. केवळ पत्रे पाठवून आणि आरोप करून रस्त्याचा प्रश्न सुटणार नाही. जनतेला दर्जेदार आणि पूर्ण रस्ता हवा आहे. त्यामुळे काम थांबविण्याऐवजी ते पूर्ण करून घेण्याला प्राधान्य दिले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

'रस्त्यासाठी आवाज उठवायला ग्रामपंचायत सदस्य असण्याची गरज नाही. मी या देशाचा करदाता नागरिक आहे. जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या करातून हा रस्ता होत आहे. या रस्त्यावर अपघातात जीव गमावणारे नागरिक माझे आहेत. त्यामुळे एक जबाबदार नागरिक म्हणून मला प्रश्न विचारण्याचा आणि काम पूर्ण करून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे,' असे विखे म्हणाले.

### पराभवाने कोणी संपत नाही

आपल्या राजकीय भवितव्याबाबतही त्यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले. 'एका निवडणुकीतील पराभवाने कोणी माजी होत नाही किंवा संपत नाही. निवडणूक पुन्हा होणार आहे. २०२९मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लागणारा निकाल सर्वांसमोर असेल,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जागतिक परिस्थितीमुळे अडचणी निर्माण झाल्या असतानाही नगर-मनमाड रस्त्याचे जवळपास ६० टक्के काम पूर्ण झाले असल्याचा दावा डॉ. विखे यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाला गती देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

# म्हैसवळण घाटमार्गे अकोले-कसारा एसटी पुन्हा सुरू

## १७ ऑगस्टपासून सेवा सुरू । मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील म्हैसवळण घाटमार्गे धावणारी अकोले–कसारा एसटी बससेवा गेल्या अनेक दिवसांपासून बंद होती. अखेर सोमवार, १७ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता अकोले येथून ही बस पुन्हा प्रवाशांच्या सेवेत दाखल झाली. बस सुरू झाल्यानंतर मार्गावरील विविध गावांमध्ये ग्रामस्थांनी उत्साहात स्वागत केले.



चंदगिरवाडी येथे ग्रामस्थांनी बस कर्मचाऱ्यांना फेटा बांधून तसेच श्रीफळ फोडून बसचे पूजन केले. चंदगिरवाडीचे युवा उद्योजक नामदेव घोरपडे, ड. सिद्धेश्वर लांघी तसेच एकदरे-चंदगिरवाडी परिसरातील ग्रामस्थांनी अकोले आगाराचे आगारप्रमुख सुरेश दराडे यांची भेट घेऊन अकोले, देवठाण, केळी, सांगवी, खिरविरे, एकदरे, म्हैसवळण घाटमार्गे कसारा एसटी सेवा सुरू करण्याबाबत निवेदन दिले होते.

या निवेदनाची तत्काळ दखल घेत आगारप्रमुखांनी १७ ऑगस्ट २०२६ पासून बससेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार सोमवारी सकाळी ७ वाजता बस अकोल्याहून कसाऱ्याकडे मार्गस्थ झाली.

बससेवा पुन्हा सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांना सुलभ, सुरक्षित व वेळेवर प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली असून प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या बससेवेमुळे परिसरातील दळणवळणाचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागणार असून मुंबईकडे नोकरी, व्यवसाय व इतर कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

यावेळी ॲड. सिद्धेश्वर लांघी, नामदेव घोरपडे, चंदगिरवाडीचे सरपंच यशवंता बेंडकोळी, नामदेव साबळे, बाळू आव्हाड, कुंडलिक भांगरे, गोवा पाटील, नामदेव भांगरे तसेच परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्वातंत्र्यानंतर प्रथमच अंतरवाली बुद्रुकला बससेवा

## विद्यार्थी व ग्रामस्थांची गैरसोय दूर । चापडगाव मार्गे नवीन बससेवेचा शुभारंभ

**● शेवगाव । वीरभूमी–**

अंतरवाली बुद्रुक येथील विद्यार्थी व ग्रामस्थांच्या दैनंदिन प्रवासाची गरज लक्षात घेऊन चापडगाव–बेलगाव मार्गे अंतरवाली बुद्रुक या मार्गावर स्वातंत्र्यानंतर तब्बल ८० वर्षांनी प्रथमच नवीन बससेवा सुरू करण्यात आली. त्यामुळे विद्यार्थी व ग्रामस्थांची मोठी गैरसोय दूर झाली आहे.



अंतरवाली बुद्रुक येथील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी चापडगाव विद्यालयात येतात. मात्र, दळणवळणाची पुरेशी सुविधा नसल्याने त्यांना मोठे अंतर पायी किंवा सायकलने पार करावे लागत होते. नवीन बससेवेमुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित, सुलभ व नियमित शैक्षणिक प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे.

ग्रामस्थांचे आठवडी बाजार तसेच सहकारी व शासकीय बँकेचे व्यवहार चापडगाव येथे होत असल्याने या बससेवेचा नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. विशेषतः वृद्ध नागरिकांची ये-जा सुलभ झाली आहे. गावात प्रथमच बस आल्याने ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

बससेवेचे चालक बाबासाहेब ससे व वाहक प्रफुल्ल ताकमोडे यांचा चापडगाव विद्यालय व अंतरवाली बुद्रुक ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच ब्रह्मदेव आठरे, अमोल पठाडे, उपसरपंच जालिंदर कापसे, रामभाऊ कुलाळ, विश्वनाथ पालवे, संभाजी आठरे, सिताराम आठरे, माजी सरपंच राजेंद्र पोपळघट, रामेश्वर पालवे, भगवान उगले, नानासाहेब गायकवाड, रविंद्र पठाडे, शिवाजी काकडे, जनार्धन पठाडे, विजय पाथरकर, प्रल्हाद जाधव, दिनकर मोरे, लक्ष्मण कापसे, ज्ञानेश्वर तहकीक आदी मान्यवर उपस्थित होते.

गावकऱ्यांची एकजूट, संस्था प्रशासनाचे प्रयत्न आणि विद्यार्थ्यांच्या सोयीचा ध्यास यामुळे चापडगाव मार्गे अंतरवाली बुद्रुक बससेवेचे स्वप्न साकार झाले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. बससेवा सुरू करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल आगार व्यवस्थापक अमोल कोतकर, वाहन नियंत्रण अधिकारी स्वप्निल गहाळ व राहुल शेळके यांचे ग्रामस्थ व शाळा प्रशासनाने आभार मानले.

ही बससेवा सुरू करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे, जि. प. सदस्या हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, प्राचार्य संपत दसपुते, रामेश्वर पालवे तसेच अंतरवाली बुद्रुकचे सरपंच, उपसरपंच, सोसायटी चेअरमन, व्हाईस चेअरमन व ग्रामस्थांनी अथक परिश्रम घेतले. वेळोवेळी आगार व्यवस्थापकांशी संपर्क साधून पत्रव्यवहार केल्यामुळे ही बससेवा सुरू होऊ शकली.

# ताजनापूर लिफ्ट मधून माळेगाव ने परिसरातील बंधाऱ्यांत तातडीने पाणी सोडा

## शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा । मागणी पूर्ण न झाल्यास २४ ऑगस्टला ताजनापूर कार्यालयाला घेराव

**● शेवगाव । वीरभूमी–**

ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक २ मधून माळेगाव–ने परिसरातील विविध बंधाऱ्यांमध्ये तातडीने पाणी सोडण्यात यावे, या मागणीसाठी ॲड. शिवाजीराव काकडे व परिसरातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. मागणीची पूर्तता न झाल्यास सोमवार, २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता शेवगाव येथील ताजनापूर मध्यम प्रकल्प उपविभागीय कार्यालयाला घेराव घालण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

ॲड. शिवाजीराव काकडे व जगन्नाथ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन ताजनापूर मध्यम प्रकल्प उपविभागाचे उपविभागीय अधिकारी श्रीहरी कुलकर्णी यांना देण्यात आले. निवेदनाच्या प्रती अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, अहिल्यानगर यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत.

ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक २ मध्ये शेवगाव तालुक्यातील १८ गावांचा समावेश व्हावा, यासाठी माळेगाव ने परिसरातील शेतकऱ्यांनी यापूर्वी शेळ्या, मेंढ्या व जनावरांसह आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतरही माळेगाव ने परिसरातील विविध बंधारे ताजनापूर उपसा योजनेतून भरून देण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. मात्र, इलेक्ट्रिक व मेकॅनिकल विभागाच्या अडचणींचे कारण देत इलेक्ट्रिक पॅनल बॉक्स व मोटारींच्या दुरुस्तीचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला आहे. मात्र, त्यानंतरही मागणीची पूर्तता न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे, असे ॲड. काकडे यांनी सांगितले.

पावसाने दडी मारल्याने परिसरातील शेतीपिके पाण्याअभावी जळून जाण्याच्या स्थितीत आहेत. या भागात शेतीला जोडधंदा म्हणून मोठ्या प्रमाणात दुग्ध व्यवसाय केला जात असून, पाण्याअभावी त्यावरही परिणाम होत आहे. जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. प्रशासनाकडे वारंवार विनंती करूनही मागणीची दखल घेतली जात नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.



शेवगाव : ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक २ मधून माळेगाव ने परिसरातील विविध बंधाऱ्यांमध्ये तातडीने पाणी सोडण्याच्या मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी श्रीहरी कुलकर्णी यांना देताना ॲड. शिवाजीराव काकडे, जगन्नाथ गावडे, पंढरीनाथ सुडके, पोपट देशमुख, प्रकाश देशमुख व इतर शेतकरी.

माळेगाव ने परिसरातील विविध बंधाऱ्यांमध्ये ताजनापूर योजनेतून तातडीने पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मागणीची पूर्तता न झाल्यास २४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता ताजनापूर मध्यम प्रकल्प उपविभागीय कार्यालयाला घेराव आंदोलन करण्यात येईल. तसेच प्रश्न सुटेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशाराही देण्यात आला आहे. निवेदनावर पंढरीनाथ सुडके, पोपट देशमुख, प्रकाश देशमुख, अजिनाथ सुडके, पंढरीनाथ घनवट, नारायण निजवे यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.